# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

**प्रश्नपुस्तिका क्र.** **GS2021**
**BOOKLET No.**

**Total Que. : 100**
**Marks : 200**
**Time : 120 min**


**Mob. No. 9923262977**
**Date :26/12/2021**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2021**
**विषय : — सामान्य अध्ययन [011]**
**पेपर क्र. (५५५)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

1. सुबोध कुमार जैस्वाल यांची सीबीआयचे संचलक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्या अनुषंगाने केंद्रीय अन्वेषण विभागाबाबत (CBI) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?

1) दिल्ली विशेष पोलीस आस्थापना कायदा 1946 (DSPE Act) अन्वये स्थापित ही एक वैधानिक संस्था आहे

2) सीव्हीसी कायदा 2003 नुसार सीबीआय संचालक निवडीसाठी उच्चस्तरीय समितीची तरतूद आहे

3) लोकपाल व लोकायुक्त कायदा 2013 अन्वये सीबीआय संचालकाचा कार्यकाल 2 वर्षे निश्चित करण्यात आला आहे

4) वरीलपैकी एकही नाही

---

2. एन.व्ही.रमन्ना यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाली आहे. त्यासंबंधी अयोग्य विधान ओळखा ?

1) ते भारताचे 48 वे सरन्यायाधीश ठरले आहेत

2) सरन्यायाधीश होणारे ते आंध्र प्रदेशातील व्दितीय व्यक्ती आहेत

3) आणीबाणी विरोधातील आंदोलन आणि पत्रकारितेचा त्यांना अनुभव आहे

4) त्यांनी आंध्रप्रदेशचे महाधिवक्ता (Advocate General) म्हणूनही काम केले आहे

---

3. खालील विधाने विचारात घ्या आणि चूक नसलेले / ली विधान /ने ओळखा ?

अ) सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासात प्रथम 10 न्यायाधीशांना एकत्र शपथ देण्याची घटना घडली

ब) राष्ट्रपतीनी सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची (सरन्यायाधीश वगळता) कमाल संख्या 30 वरून 33 केली आहे

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब 4) एकही नाही

---

4. खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य विधान /ने ओळखा ?

अ) अलीकडे विजय सांपला यांची राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाचे (NCST) अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली

ब) 89 वी घटनादुरूस्ती 2003 व्दारे राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाची (NCST) स्थापना करण्यात आली

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ आणि ब 4) एकही नाही

---

5. ममता बॅनर्जी यांच्याबाबत खालील विधाने विचारात घ्या आणि योग्य पर्याय निवडा ?

अ) त्यांनी तिसऱ्यांदा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली

ब) पश्चिम बंगाल विधानसभेत त्या भवानीपूर मतदारसंघातून आमदार आहेत

क) 1998 मध्ये भारतीय कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडत त्यांनी 'त्रिणमूल कॉंग्रेस' पक्षाची स्थापना केली होती

ड) टाईमच्या 2021 मधील जगातील सर्वात प्रभावी 100 व्यकतींमध्ये त्यांचा समावेश आहे

पर्यायी

1) अ, ब, क बरोबर आणि ड चूक 2) अ, क बरोबर आणि ब, ड चूक

3) अ, ब, ड बरोबर आणि क चूक 4) सर्व बरोबर

---

6. पिंगली वेंकय्या यांच्याबाबत खालील विधाने विचारात घ्या आणि अचूक विधान ओळखा ?

अ) 2 ऑगस्ट 2021 रोजी त्यांची 150 वी जयंती साजरी करण्यात आली

ब) ते बहुभाषी होते, तसेच हिऱ्यांच्या खाणकामात तज्ज्ञ होते

क) स्वतंत्र भारताचा तिरंगा त्यांनी डिझाईन केला होता

पर्याय

1) फक्त ब 2) फक्त ब आणि क 3) अ आणि क 4) एकही नाही

---

7. नागपूर - मुंबई कॉरिडॉर हा महामार्ग कोणत्या नावाने ओळखला जाणार आहे ?

1) सुखसोयी महामार्ग 2) समृध्दी महामार्ग 3) सुसाट महामार्ग 4) सुवर्ण महामार्ग

---

8. दरबार मूव्ह (Darbar Move) बाबत खालील विधाने विचारात घ्या आणि अचूक विधान ओळखा ?

अ) यानुसार जम्मू काश्मीरच्या राजधानीचे वर्षातून 2 वेळा स्थलांतर केले जाते

ब) मे ते ऑक्टोंबर महिन्यात श्रीनगर आणि नोव्हेंबर ते एप्रिल महिन्यात जम्मू येथे राजधानी हलविण्यात येते

क) डोग्रा राजा महाराजा गुलाबसिंग यांनी 1872 मध्ये ही पध्दत सुरू केली होती

पर्याय

1) फक्त ब 2) फक्त ब आणि क 3) अ आणि ब 4) एकही नाही

---

9. मोपला उठाव संदर्भात खालीलपैकी कोणते /ती विधान /ने बरोबर आहे / त ?

अ) 1921 मध्ये केरळच्या मापिला मुस्लिमांनी ब्रिटिशांविरूध्द पुकारलेला हा सशस्त्र बंड होता

ब) केरळच्या मलबार प्रदेशातील वारीयाम्कून्नाथ कुन्जाहम्मद हाजी यांनी या उठावाचे नेतृत्व केले होते

क) हिंदू जमीनदारांपासून होणाऱ्या दडपशाहीला तोंड देण्यासाठी मापिला शेतमजुरांनी हे आंदोलन पुकारले होते

पर्यायी उत्तरे

1) अ व ब 2) ब व क 3) अ व क 4) अ, ब आणि क

---

10. खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजने संदर्भात खालीलपैकी कोणते/ ती विधान/ने चुकीचे आहे/त ?

अ) 1993 मध्ये केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयांतर्गत या योजनेची सुरवात करण्यात आली होती

ब) कोविड - 19 मुळे ग्रामीण भागातील रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी 2020-21 आणि 2021-22 सालासाठी या निधीमध्ये वाढ करण्यात आली आहे

पर्यायी उत्तरे

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही

---

11. खालीलपैकी कोणते / ती विधान / ने बरोबर आहे / त ?

अ) युटयूबवर न्यायालयीन कार्यवाहीचे थेट प्रक्षेपण करणारे मुंबई उच्च न्यायालय हे देशातील पहिले न्यायालय ठरले आहे

ब) स्वप्रिल त्रिताठी विरूध्द भारतीय सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयाच्या कार्यवाहीचे थेट प्रक्षेपण करण्याच्या बाजूने निकाल दिला आहे

पर्यायी उत्तरे

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही

---

12. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) आंतरराष्ट्रीय ओझोन दिन | i) 21 मार्च |
| 2) जागतिक जिवावरण दिन | ii) 16 सप्टेंबर |
| 3) राष्ट्रीय स्वच्छता दिन | iii) 21 सप्टेंबर |
| 4) जागतिक वन दिन | iv) 2 ऑक्टोंबर |

1) i ii iii iv 2) ii i iv iii

3) iii i iv ii 4) ii iii iv i

---

13. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब) |
|---|---|
| 1) काळा पैसा समिती | i) महावीर त्यागी |
| 2) कृषी कर समिती | ii) वांच्छू समिती |
| 3) अप्रत्यक्ष कर समिती | iii) राज समिती |
| 4) कर चुकवेगिरी समिती | iv) एल.के.झा समिती |

1) i ii iii iv 2) ii iii iv i

3) ii i iv iii 4) iv iii ii i

---

14. केंद्रीय वित्त आयोगाच्या बाबतीतील योग्य विधान ओळखा

अ) घटना कलम क्रमांक 280 नुसार केंद्रीय वित्त आयोगाची स्थापना केली जाते

ब) आतापर्यंत भारतात 1.5 वित्त आयोग नेमण्यात आलेले आहेत

क) पहिला वित्त आयोग 1951 मध्ये के.सी.नियोगी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेला होता.

1) फक्त अ व ब 2) फक्त अ व क 3) फक्त क 4) फक्त ब

---

15. विविध बँका आणि बँकांची स्थापना वर्ष यांच्या योग्य जोडया लावा.

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) भारतीय रिझर्व्ह बँक | i) 1 जाने. 1982 |
| 2) भारतीय औद्योगिक विकास बँक | ii) 1 एप्रिल 1935 |
| 3) भारतीय आयात निर्यात बँक | iii) 12 जुलै 1982 |
| 4) राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक | iv) 16 मे 1964 |

1) ii iv i iii 2) ii i iii iv

3) ii i iv iii 4) iv iii ii i

---

16. आभासी न्यायालयाबाबत खालील विधाने विचारात घ्या आणि अचूक विधान ओळखा ?

अ) भारतात सध्या 10 आभासी न्यायालये कार्यरत आहेत

ब) 2019 मध्ये दिल्लीत सर्वप्रथम आभासी न्यायालय सुरू करण्यात आले होते

क) महाराष्ट्रात पुणे आणि नागपूर या दोन ठिकाणी आभासी न्यायालये कार्यरत आहेत

1) अ व ब 2) ब व क 3) अ व क 4) अ, ब व क

---

17. स्थूल देशांतर्गत उत्पादनातून स्थिर भांडवलाचा घसारा वजा केल्यास प्राप्त होणाऱ्या मुल्यास काय म्हणतात ?

1) निव्वळ राष्ट्रीय उत्पन 2) स्थूल देशांतर्गत उत्पन्न

3) निव्वळ देशांतर्गत उत्पन 4) स्थूल देशांतर्गत उत्पन्न

---


www.spandancareers.org

18. 27 डिसेंबर 1945 रोजी स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा पुढीलपैकी कोणता एक उद्देश नव्हता ?

अ) सदस्य देशांना उत्पादक कार्यासाठी कर्ज उपलब्ध करणे

ब) सभासद राष्ट्रातील गरीब राष्ट्रांना अन्नधान्याचा मोफत पुरवठा करणे

क) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा संतुलित विकास होण्यासाठी दीर्घकालीन कर्जपुरवठा करणे

ड) सदस्य राष्ट्रांना आर्थिक आणि विकासासाठी दीर्घकालीन कर्जपुरवठा करणे

1) फक्त ब 2) फक्त अ 3) फक्त क 4) फक्त ड

19. वखार महामंडळ स्थापण्यामागे केंद्र व राज्य सरकारचा खालीलपैकी कोणता मुख्य उद्देश असतो ?

1) बि-बियाणांच्या व खतांचे योग्य वितरण करणे 2) शेतकऱ्यांना पुनर्वित्तसहाय्य करणे

3) शेतमाल साठवण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देणे 4) शेतमालांवर प्रक्रिया करणे

20. 24 जुलै 1991 सालच्या नव्या औद्योगिक धोरणाचे योग्य वैशिष्टय कोणते ते खालील पर्यायातून ओळखा.

अ) औद्योगिक परवाना पध्दतीतील अनावश्यक निर्बंध कमी करणे

ब) परकीय तंत्रज्ञान व गुंतवणूकीस प्रेरणा देवून भारतीय उद्योगांची जागतिकीकरणातील भूमिका विकसित करणे

क) बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार भारतातील उद्योगिक पुनर्रचना करणे

ड) औद्योगिक परवाना धोरण 100 उघौगांच्या बाबतीत नियंत्रित करणे

1) ब व क योग्य 2) अ, ब, क योग्य 3) क व ड योग्य 4) यांपैकी नाही

21. विधान A : मंदीतून अर्थव्यवस्था बाहेर आल्यानंतर उद्योगक्षेत्र काही काळासाठी भरभराटीस येतो

स्पष्टीकरण R मंदी ओसरल्यावर चलनवाढीचे प्रमाण तुलनेने अधिक असल्यामुळे गुंतवणूकीसाठी घेतलेल्या कर्जाची 'वास्तविक किंमत' कमी असते

1) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे

2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही

3) विधान A योग्य , R अयोग्य

4) विधान A अयोग्य, R योग्य

22. चलनवाढीचा गुंतवणूकीवर होणाऱ्या परिणासंदर्भात खालील विधाने विचारात घेऊन योग्य पर्याय निवडा

अ) चलनवाढीचा काळात वस्तु व सेवांच्या मागणीत वाढ झाल्यामुळे उद्योजक-व्यावसायिकांना चलनवाढ म्हणजेच सुवर्णकाळ ठरतो

ब) चलनाची किंमत कमी झाल्यामुळे उद्योजोकांनी त्या काळात घेतलेल्या कर्जाची किंमत वास्तविक कर्जाच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे गुंतवणूकीत वाढ होते

1) फक्त अ योग्य 2) फक्त ब 3) अ व ब योग्य 4) दोन्ही योग्य

23. मानव निर्धनता निर्देशांकासंबंधी अयोग्य विधान ओळखा ?

1) हा निर्देशांक 1997 साली पहिल्यांदा काढण्यात आला

2) एचपीआय - 1 हा निर्देशांक विकसनशील देशांसाठी आहे

3) एचपीआय - 2 हा निर्देशांक विकसित देशांसाठी आहे

4) एपीआय - 3 हा निर्देशांक आफ्रिकन देशांसाठी आहे

24. भारतीय रोखे व विनिमयमंडळ (सेबी) च्या बाबत योग्य विधान ओळखा ?

अ) 12 एप्रिल 1988 रोजी सेबीची स्थापना केली

ब) मार्च 1992 रोजी कायदेशीर मान्यता मिळाली

क) एम. नरसिंहम समितीच्या शिफारशीनुसार कायदेशीर मान्यता दिली गेली

ड) शेअर बाजार व रोखे बाजारातील व्यवहाराचे नियंत्रण करते

1) अ व ब दोन्ही 2) क व ड योग्य 3) फक्त क 4) वरील सर्व योग्य

25. आरबीआयच्या वार्षिक धोरणाला .......................... म्हणतात

1) मौद्रिक व पतधोरण 2) अर्थसंकल्पीय धोरण 3) वित्तीय धोरण 4) राजकोषीय धोरण

26. भारतीय बँकिंग लोकपाल संस्थेच्या बाबतीतील अयोग्य विधान कोणते ते ओळखा

1) बँकींग लोकपालाची निर्मिती RBI करते

2) बँकींग लोकपाल भारतीय बँकेत पैसे ठेवण्यात अनिवासी भारतीयांच्या तक्रारीचे निवारण करते

3) विदेशी बँकांची भारतात स्थापना करताना बँकींग लोकपालाची परवानगी लागते

4) बँकींग लोकपालाने दिलेली सेवा मोफत असते

27. 1 जुलै 1955 ला इंपेरियल बँकेचे रूपांतर एसबीआयमध्ये करण्यात आले. या रूपांतराची शिफारस कोणत्या समितीने केली ?

1) केळकर समिती 2) रंगराजन समिती 3) ए.डी.गोरवाल 4) नरसिंह समिती

www.spandancareers.org

28. भारताने आझोनच्या संरक्षणासाठी पुढीलपैकी कोणता प्रयत्न केला आहे ?

1) हॅलोन्सचे उत्पादन आणि उपयोग यावर पूर्ण बंदी घातली आहे

2) मागील तीन वर्षापासून भारताने 5600 मॅट्रिक टन CFC चे उत्पादन बंद केले आहे

3) राष्ट्रीय कार्बन टेट्रा क्लोराईट प्रतिबंध योजना सुरू केली आहे

4) वरील सर्व योग्य

---

29. क्युटो प्रोटोकॉलच्या बाबतीत अयोग्य विधान ओळखा

1) जागतिक तापमान वाढीविरूध्द हे संमेलन आयोजित करण्यात आले होते

2) 16 मार्च 1998 पर्यंत क्युटो प्रोटोकॉल स्वाक्षऱ्यांसाठी खुला ठेवण्यात आला होता

3) क्युटो प्रोटोकॉलमध्ये 180 सभासद देशांनी सह्या केल्या

4) क्युटो प्रोटोकॉलवर अमेरिकेने प्रथम स्वाक्षरी केली.

---

30. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) जैवमंडलीय रिझर्व्ह क्षेत्र कार्यक्रम | i) इ.स. 2002 |
| 2) जैवविवधता अधिनियम | ii) इ.स. 1986 |
| 3) जैव सुरक्षा प्रोटोकॉल | iii) इ.स. 2006 |
| 4) राष्ट्रीय वाघ संरक्षण प्राधिकरण | iv) इ.स. 2003 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | i | ii | iii | iv |
| 2) | ii | i | iii | iv |
| 3) | ii | i | iv | iii |
| 4) | iv | iii | ii | i |

---

31. जैवविविधता संयुक्त राष्ट्र कोप - 11 बाबतीतील योग्य विधान ओळखा

अ) 1 ते 19 ऑक्टोंबर 2012 या दरम्यान हैद्राबाद येथे संमेलन भरले

ब) या संमेलनामध्ये जैवविविधतेच्या भविष्याविषयी 30 प्रस्तावावर विचार झाला

क) पुढील वर्षी होणारे संमेलन दक्षिण आफ्रिकेला होणार आहे

ड) या संमेलनात 12000 पेक्षा जास्त विविध विषय तज्ञांनी सहभाग घेतला होता

अ) अ, ब, क योग्य 2) अ व ब योग्य 3) अ, ब व ड योग्य 4) वरील सर्व योग्य

---

32. 'मिशन कर्मयोगी' बाबत खाललपैकी कोणते/ती विधान/ने बरोबर आहे /त ?

अ) हा सार्वजनिक उद्योगांतील कामगारांसाठीचा कौशल्य विकास कार्यक्रम आहे.

ब) एकात्मिक सरकारी ऑनलाईन प्रशिक्षण (iGOT karmayogi platform) व्यावसापिठाव्दारे हा कार्यक्रम उपलब्ध करून दिला जाईल

1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही अ व ब नाही

---

33. खालीलपैकी कोणते विधाने योग्य आहे

1) परिसंस्थेतील परपोषी सजीव हे उत्पादक असतात

2) परिसंस्थेतील भक्षक हे व्दितीय पोषण पातळीवर आहेत

3) मांसाहारी सजीव हे व्दितीय क्षक्षक आहे

4) शाकाहारी सजीव हे परिसंस्थेत सर्वोच्च पातळीवर असतात

---

34. केंद्र सरकारने राष्ट्रीय नदी संरक्षण योजना सुरू केली आहे त्या बाबतीतील पुढीलपैकी अयोग्य विधान कोणते ते ओळखा ?

1) या योजनेमध्ये देशातील 34 नद्या, 20 राज्ये व 160 शहरांचा समावेश करण्यात आला आहे

2) मोकळया नाल्यांमधील नदीत सोडले जाणारे पाणी एकत्र करून स्वच्छ करणे

3) वृक्षारोपण आणि लोकांमध्ये जागृती निर्माण करणारे कार्यक्रम राबविणे

4) ही योजना प्रथम प्रत्येक राज्यात राबवून नंतर पुढील राज्यांमध्ये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे

---

35. ओझोनच्या आच्छादनामुळे झालेल्या अकाली मृत्युनंतर देशांचा योग्य क्रम लावा

अ) चीन ब) भारत क) बांग्लादेश ड) अमेरिका

1) अ, ब, ड, क 2) ड, अ, ब, क

3) अ, ब, क, ड 4) ब, अ, ड, क

---

36. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) पर्यावरण शिक्षण केंद्र | i) अहमदाबाद |
| 2) परिस्थिती विज्ञान केंद्र | ii) बंगळुरू |
| 3) भारतीय वन प्रबंधन संस्था | iii) दिल्ली |
| 4) पर्यावरण प्रबंधन केंद्र | iv) भोपाळ |

1) i ii iii iv　　2) ii iii iv i
3) iii i iv ii　　4) i ii iv iii

37. अयोग्य विधान ओळखा

1) स्थायी उतींच्या पेशीमध्ये सतत विभाजन होत असते
2) पेशी ही सजीवांच्या संरचना आणि कार्याचे मूलभूत आणि कार्याचे मूलभूत एकक असते
3) वनस्पती पेशीमध्ये प्रद्रव्यपटल हे बाह्यतम आवरण असते
4) हरितलवकांना आत्मघातकी पिशव्या असे म्हणतात

38. पुढीलपैकी अयोग्य विधान कोणती ती ओळखा

अ) चुंबकाचे ध्रुव नेहमी जोडीजोडीने असतात
ब) विद्युत चुंबकत्वाचा शोध ओरस्टेडने लावला
क) चुंबकापासून दूर गेल्सास चुंबकीय क्षेत्र वाढते
ड) विद्युत जनित्र हे विद्युतधारेच्या निर्मितीसाठी वापरतात

1) विधान अ व क अयोग्य　　2) विधान ड अयोग्य
3) विधान क अयोग्य　　4) विधान क व ड अयोग्य

39. पुढीलपैकी योग्य जोडी ओळखा

1) बर्ड फ्ल्यु - एच$_1$ एन$_1$
2) कुष्ठ रोग - मायकोबॅक्टेरियम लेप्री
3) पोलिओ - मॅक्झोवायरस
4) मलेरिया - पेशींची अमर्याद वाढ

40. योग्य जोडया लावा

| (शास्त्रज्ञ) | (शोध) |
|---|---|
| 1) इक्रॅरिअर जॅन्सन | i) सूक्ष्मदर्शक |
| 2) रॉबर्ट हूक | ii) बुचातील मृत पेशी |
| 3) अॅन्टोन वॅन ल्युवेन्हॉक | iii) जिवंत पेशीचे निरीक्षण |
| 4) जोहॅनिस पुरकिंग्जे | iv) पेशीतील द्रव्याला प्रद्रव्य |

1) i ii iii iv　　2) iii i iv ii
3) iv ii iii i　　4) iii iv ii i

41. किरणोत्सारी अणूमधून अल्फा कणाचे निर्गमन होऊन त्याचे नवीन अणूत रूपांतर झाले असता

1) अणुवस्तुमानांक 4 ने आणि अणुअंक 2 ने कमी होतो
2) अणुवस्तुमानांक 2 ने आणि अणुअंक 4 ने कमी होतो
3) अणुवस्तुमानांक 4 ने अणुअंक 2 ने वाढतो
4) अणुवस्तुमानांक व अणुअंक दोन्ही सारखेच राहतात

42. बोरॉन् आणि कॅल्शिअमची कमतरता पिकाच्या पानाच्या कोणत्या भागावर दिसतात ?

1) जूनी खालची पाने　2) पानाच्या मधल्या शिरा　3) शेंडयाची पान　4) पानाच्या शिरामधील भाग

43. जीवनसत्वांचे वर्गीकरण कशा प्रकारे केले जाते ?

अ) प्राणिज व वनस्पतीज जीवनसत्वे
ब) जलद्राव्या व स्निग्धद्राव्य जीवनसत्वे
क) सेद्रीय व असेंद्रीय जीवनसत्वे
ड) द्रव व घन जीवनसत्वे

1) फक्त अ　2) फक्त ब　3) अ, क, ड　4) अ, ब, क

44. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) गॅल्व्हनायझिंग | i) प्रेशर कुकर |
| 2) कथिलीकरण | ii) चांदी विलेपित चमचे |
| 3) विद्युतविलेपण | iii) कथिलाचा तांब्यावर थर |
| 4) धनाग्रीकरण | iv) जस्ताचा लोखंडावर पातळ थर |

1) iv iii ii i　　2) ii i iii iv
3) ii i iv iii　　4) iv iii i ii

45. मानवी शरीरामध्ये कोलेस्टेरॉलची मात्रा किती असते ?
1) रक्ताच्या 250 मिग्रा एकक
2) रक्ताच्या 240 मिग्रा/डेलि
3) रक्ताच्या 5 मिली एकक
4) रक्ताच्या एक इंजेक्शन सिरीजएवढे

46. सध्या इन्सुलिन हे औषध कमी किंमतीत मिळते आहे. त्याचे कारण म्हणजे.............
1) जनुकीय परिवर्तित जिवाणू ते तयार करतता
2) येथे जिवाणूंना दिले जाणारे अन्न अतिशय स्वस्त आहे
3) किण्वनाची प्रक्रिया अतिशय वेगाने असते
4) किण्वन करण्याची जी संयंत्रे वापरली जातात ती वर्षानुवर्ष टिकतात

47. बहिर्वक्र भिंगासमोर $2F_1$ च्या पलीकडे वस्तू ठेवली असता तयार होणारी प्रतिमा ......................... असते
1) वास्तव व वस्तूपेक्षा मोठी
2) आभासी व वस्तूपेक्षा मोठी
3) वास्तव व वस्तूपेक्षा लहान
4) आभासी व वस्तूपेक्षा लहान

48. आधुनिक आवर्तसारणी बाबतची योग्य विधाने कोणती ती ओळखा
अ) मुलद्रव्याचे सारणीतील स्थान इलेक्ट्रॉन संरूपणाशी निगडीत असते
ब) आवर्तसारणीची सुरूवात अणूच्या बाह्यतम कक्षेत एक इलेक्ट्रॉन असलेल्या मूलद्रव्याने होते
क) मूलद्रव्यांचा गणक्रमांक अणूच्या बाह्यतम कक्षेतील इलेक्ट्रॉन संख्येइतकाच असतो
ड) एका गणातील सर्व मूलद्रव्यांच्या बाह्यतम कक्षेत इलेक्ट्रॉन संरचना वेगळी असते
1) फक्त अ व ब
2) फक्त अ व क
3) फक्त अ, ब, क
4) फक्त अ, ब, ड

49. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा
अ) प्राणी व वनस्पतीच्या केद्रकातील गुणसुत्र प्रथिनांनी बनलेली असतात
ब) सजीवांच्या प्रत्येक पेशीतील केंद्रकात गुणसुत्राची संख्या समान नसते
क) कोणत्याही जातीच्या गुणसूत्रांची संख्या कायम असते
ड) गुणसुत्रे रंगद्रव्यांची बनलेली असतात
1) फक्त अ व क
2) फक्त अ, क, ड
3) फक्त अ, ब, क
4) वरीलपैकी सर्व

50. इन्सूलीनचा शोध कोणत्या शास्त्रज्ञाने लावला ?
1) रॉबर्ट हुक
2) रॉबर्ट फॉराडे
3) फ्रेड्रीक बेंटीक व बेस्ट
4) विल्यम हार्वे

51. पुढीलपैकी योग्य विधान ओळखा
अ) निहरित शैवाल हे आदिकेंद्रकी आहे
ब) सर्व लवकांमध्ये रंगद्रव्ये असतात
क) पेशीभित्तिका ही मुक्त पटल आहे
ड) पार्श्व विभाजी उतीमुळे खोडाची लांबी वाढते
1) फक्त अ व क
2) फक्त ब व क
3) फक्त ड
4) फक्त अ

52. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) व्हिनेगार | i) ब्युटिरिक आम्ल |
| 2) दूध | ii) फॉर्मिक आम्ल |
| 3) लाल मुंग्या | iii) ॲसेटिक आम्ल |
| 4) लोणी | iv) लॅक्टिक आम्ल |

1) ii i iii iv
2) iii iv ii i
3) ii i iv iii
4) iv ii iii i

53. खालीलपैकी कोणता जीव हा आदिजीव व एकपेशीय सुक्ष्मजीव नाही ? योग्य पर्याय निवडा
1) युग्लिना
2) पॅरामेशिअम
3) अमिबा
4) बुरशी

54. विधान A : वस्तू पाण्यात असताना तिचे वजन कमी भासते
स्पष्टीकरण R : द्रव बुडालेल्या वस्तूला वर ढकलले जाते
1) विधान A हे R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे
2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही
3) विधान A योग्य, R अयोग्य
4) विधान A अयोग्य, R योग्य

55. रासायनिक रूपामधील शुष्क बर्फ (Dry Ice) म्हणजे ............................ असतो
1) शुष्क सल्फर डॉयऑक्साईड
2) शुष्क कार्बनडॉऑक्साईड
3) शुष्क क्लोरीन
4) रासायनिक क्रिया करून बनवलेला बर्फ

www.spandancareers.org

56. विद्युतपरिपथातील वितळतार (Fuse) बद्दल योग्य विधान कोणते ?

1) ती समांतर जोडणीने विद्युत उपकरणाशी जोडलेली
2) ती चांदीच्या संयुगापासून बनवलेली असते
3) तिचा द्रवणांक हा फार कमी असतो
4) तिचा विद्युत वाहक क्षमता जास्त असते

57. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) कॅल्शिअमचा अभाव | i) वाढ खुंटणे |
| 2) फॉस्फरसचा अभाव | ii) हाडे ठिसूळ होणे |
| 3) लोहाचा अभाव | iii) पंडुरोग |
| 4) आयोडीनचा अभाव | iv) गलगंड |

1) i ii iii iv
2) ii i iii iv
3) ii i iv iii
4) iv iii ii i

58. पहिल्या पंचवार्षिक योजनेविषयी दिलेल्या पर्यायातून अयोग्य पर्याय कोणते तो ओळखा

अ) पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी गुलझारीलाल नंदा हे उपाध्यक्ष होते
ब) पहिली पंचवार्षिक योजना पी.सी.महालनोबीस प्रतिमानावर आधारित होती
क) पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेती, जलसिंचन व ऊर्जा या क्षेत्रावर विशेष भर देण्यात आला होता
ड) पहिल्या पंचवार्षिक योजनेत सर्वात जास्त खर्च अवजड उद्योगांवर करण्यात आला होता

1) फक्त अ व ब अयोग्य
2) फक्त ब व ड अयोग्य
3) फक्त अ व क अयोग्य
4) फक्त ब अयोग्य

59. विधान A : भारतामध्ये प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय आहे

स्पष्टीकरण R : भारतीय घटनेमध्ये अशी तरतूद आहे. प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय असेल

1) विधान A हे R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे
2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही
3) विधान A योग्य, R अयोग्य
4) विधान A अयोग्य, R योग्य

60. केंद्रीय निर्वाचन आयोगाच्या बाबतीत पुढे काही विधाने दिली आहेत. त्यातील अयोग्य विधाने असलेला पर्याय ओळखा

अ) निवडणूक आयोगाचे स्वरूप सध्या बहुसदस्यीय आहे
ब) निवडणूक आयुक्तांची नेमणूक भारताचे सरन्यायाधीश करतात
क) निवडणूक आयोगाची निर्मिती घटनेच्या 280 व्या कलमानुसार करण्यात आली आहे
ड) राजकीय पक्षांना निवडणूक चिन्ह देण्याचे काम निवडणूक आयोग करते

1) अ व ब
2) ब व क
3) क व ड
4) अ व क

61. खालील विधाने विचारात घ्या

अ) भारतीय संविधानाने ब्रिटिश संसदीय प्रारूपाचे अनुकरण केले आहे
ब) भारतात संविधान सर्वश्रेष्ठ आहे, संसद नव्हे
क) भारतातील न्यायालयांना संसदेने पारित केलेल्या कायद्याची संविधानिकता तपासण्याची सत्ता प्राप्त नाही

1) फक्त अ
2) अ व ब
3) अ व क
4) अ, ब व क

62. उत्पेक्षण (Certiorari) म्हणजे .................. होय

अ) कनिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला वरिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज याला उत्प्रेक्षण असे म्हणतात.
ब) वरिष्ठ न्यायालयाकडे चालणारा खटला कनिष्ठ न्यायालयाने चालवावा अशी विनंती करणारा अर्ज याला उत्प्रेक्षण असे म्हणतात
क) सरकारी एखादी व्यक्ती किंवा संस्था आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसेल तर तिला कर्तव्यपालन करण्याचा आदेश करणे म्हणजे उत्प्रेक्षण होय

1) फक्त क
2) फक्त ब व क
3) फक्त अ व ब
4) फक्त अ

63. विधान A : भारतामध्ये प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय आहे

स्पष्टीकरण R : भारतीय घटनेमध्ये अशी तरतूद आहे. प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय असेल

1) विधान A हे R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे
2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही
3) विधान A योग्य, R अयोग्य
4) विधान A अयोग्य, R योग्य

www.spandancareers.org

64. पुढील विधाने विचारात घेऊन योग्य विधाने कोणती ती ओळखा

अ) भारतीय घटनेत मार्गदर्शक तत्वे अमेरिकेच्या घटनेतून घेतली

ब) भारतीय घटनेत घटनादुरूस्तीची पध्दत दक्षिण आफ्रिकेकडून घेतली

क) भारतीय घटनेत सुरूवातीला 395 कलमे होती

ड) सध्या भारतीय घटनेत 12 परिशिष्टे आहेत

1) फक्त अ, ब, क योग्य 2) फक्त क व ड 3) फक्त ब, क, ड योग्य 4) फक्त ब, क योग्य

---

65. पंचायत समितीचे पुढीलपैकी कोणते कार्य नाही ? योग्य पर्याय निवडा

अ) संपूर्ण जिल्ह्यामध्ये विकास योजना राबविणे ब) तालुक्यासाठी योजनांचा आराखडा तयार करणे

क) गटविकास अधिकाऱ्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे ड) दर तीन महिन्यांनी जिल्हा परिषदेला अहवाल सादर करणे

1) फक्त ब योग्य 2) फक्त क योग्य 3) फक्त अ योग्य 4) फक्त ब, ड योग्य

---

66. विधान परिषदेच्या सदस्य संख्येच्या बाबतीतील पुढीलपैकी अयोग्य पर्याय कोणता तो ओळखा

अ) विधानसभेच्या सदस्यांकडून एक तृतीयांश सदस्य निवडले जातात

ब) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्फत एक तृतीयांश सदस्य निवडले जातात

क) शिक्षक मतदार संघातून एक बारांश सदस्य निवडले जातात

ड) पधवीधर मतदार संघातील एक षष्टांश सदस्य निवडले जातात

1) अ व ब अयोग्य 2) क व ड अयोग्य 3) फक्त ड अयोग्य 4) ब व क अयोग्य

---

67. मूलभूत कर्तव्यांच्या संदर्भात खालील विधानांचा विचार करून अयोग्य पर्याय निवडा

अ) मूलभूत कर्तव्ये नागरिकांना शिक्षित करण्याची भूमिका बजावतात

ब) हक्क कर्तव्यांसोबत निगडीत असलेच पाहिजेत

क) कर्तव्ये स्वत:हून लागू होत नाहीत

ड) अशा प्रकारची कर्तव्ये साधारणत: पाश्चात्य उदारवादी देशांच्या राज्यघटनेत आढळतात

1) फक्त अ व क 2) फक्त ब व ड 3) फक्त ब, क, ड 4) फक्त ड

---

68. 17 व्या लोकसभेच्या निवडणुकीविषयी काही विधाने दिली आहेत. त्याबाबत पुढील विधाने विचारात घ्या.

अ) लोकसभा अध्यक्षपदी ओम बिर्ला यांची निवड

ब) राजस्थानमधील कोटा लोकसभा मतदारसंघातुन ओम बिर्ला हे दुसऱ्यांदा निवडून आले

क) बिर्ला हे सन 2003 ते 2013 दरम्यान तीन वेळा राजस्थान विधानसभेचे सदस्य होते

1) अ अयोग्य 2) अ व ब अयोग्य 3) ब अयोग्य 4) अ, ब, क योग्य

---

69. लोकसभाविषयी दिलेल्या विधानांवर विचार करा.

अ) लोकसभेचा कार्यकाल आणीबाणीच्या कालखंडात संसद कायदा करून फक्त एकदाच एका वर्षासाठी वाढू शकते

ब) लोकसभा विसर्जित करण्याचा अधिकार फक्त लोकसभेच्या सभापतीलाच आहे

क) 2019 मध्ये झालेली लोकसभेची निवडणूक 17 वी आहे

ड) लोकसभेच्या पहिल्या महिला सभापती होण्याचा मान श्रीमती सुमित्रा महाजन यांना मिळाला

1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ व क 3) फक्त क व ड 4) अ, ब, क, ड

---

70. संविधानाच्या 74/1 या कलमामध्ये पुढीलपैकी कोणती बाब समाविष्ट करण्यात आली आहे ?

अ) या कलमानुसार राष्ट्रपतीला त्याच्या कार्यात मदत करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ राहिल असे स्पष्ट केले आहे

ब) या कलमानुसार राष्ट्रपती पंतप्रधानाची नेमणूक करील

क) या कलमानुसार राष्ट्रपती संरन्यायाधीशास शपथ देईल

ड) मंत्रिमंडळ संयुक्तरित्या लोकसभेला जबाबदार राहील

1) फक्त अ, ब 2) फक्त ब व क 3) फक्त क व ड 4) फक्त अ

---

71. राज्यपालांविषयी पुढील विधानांमधून योग्य पर्याय निवडा

अ) घटनेच्या 361 व्या कलमानुसार राज्यपालाने राज्यपाल म्हणून केलेल्या कृत्याबद्दल त्याच्या विरूध्द कोणत्याही न्यायालयात खटला चालू शकणार नाही

ब) घटना कलम क्रमांक 164 नुसार मुख्यमंत्र्याची नेमणूक करण्याचा अधिकार राज्यपालाला आहे

क) घटना कलम क्रमांक 332 नुसार विधान परिषदेवर दोन सदरस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्यपालाला आहे

ड) विधान परिषदेवर विविध क्षेत्रातील सहा सदस्य नेमण्याचा अधिकार राज्यपालाला आहे

1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ, ब, ड 3) फक्त क व ड 4) फक्त ब व क

---

www.spandancareers.org

72. राज्यपालांविषयी दिलेल्या विधानांमधून अयोग्य विधान निवडा

अ) राज्याचा राज्यकारभार राज्यपालाच्या नावाने चालतो

ब) राज्यातील सर्व प्रमुख पदावरील व्यक्तींच्या नेमणुक केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करतो

क) राज्यपाल हा राज्यात काम करताना उपराष्ट्रपतीच्या प्रतिनिधी म्हणून काम करतो

ड) राज्यपालाला विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार आहे

1) फक्त अ, ब 2) फक्त ब व क 3) फक्त क व ड 4) फक्त ड

---

73. विधान परिषदेविषयी दिलेल्या विधानामधून विसंगत पर्याय ओळखा

अ) संविधानाच्या 171/2 या कलमानुसार विधान परिषदेच्या रचनेसंबंधी कायदा करण्याचा अधिकार घटक राज्याच्या विधानसभेला प्राप्त झालेला आहे

ब) विधान परिषद हे घटक राज्याचे वरिष्ठ परंतु व्दितीय सभगृह आहे

क) 1956 साली सातव्या संविधान दुरूस्तीनुसार असे ठरविण्यात आले की विधान परिषदेची सदस्य संख्या तेथील विधानसभा सदस्य संख्येच्या 1/3 पेक्षा जास्त नसावी

ड) एकूण सभासद संख्येच्या 1/12 सदस्य त्या घटक राज्यातील राज्यपालाकडून नियुक्त केले जातात

1) फक्त ब 2) फक्त अ 3) फक्त अ व ड 4) ब व क

---

74. पुढीलपैकी अयोग्य पर्याय शोधा

1) महाराष्ट्र नगरपालिका कायदा - 1965 2) महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम - 1961

3) महाराष्ट्र नगरपरिषद कायदा - 1960 4) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम - 1958

---

75. महाराष्ट्रातील पुर्जन्याविषयी योग्य विधान कोणते ती ओळखा

अ) महाराष्ट्र उष्ण कटिबंधीय हवामानाच्या प्रदेशात येतो

ब) महाराष्ट्रात प्रतिरोध स्वरूपाचे पर्जन्य होते

क) महाराष्ट्रात ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे पर्जन्य जास्त प्रमाणात होते

ड) महाराष्ट्रात विदर्भात आवर्तामुळे पाऊस पडतो

1) अ, ब, क 2) फक्त अ व ब 3) अ, ब, ड 4) सर्वच

---

76. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) नंदादेवी | i) सिक्कीम |
| 2) मानस | ii) पश्चिम बंगाल |
| 3) सुंदरबन | iii) आसाम |
| 4) कांचनगंगा | iv) उत्तराखंड |

1) iv iii ii i 2) ii iii iv i

3) iii i iv ii 4) iv i iii ii

---

77. योग्य जोडया लावा

| (राष्ट्रीय उद्याने) | (राज्य) |
|---|---|
| 1) काझीरंगा राष्ट्रीय उद्यान | i) ओडिशा |
| 2) इंद्रावती नॅशनल पार्क | ii) आसाम |
| 3) भगवान महावीर नॅशनल पार्क | iii) छत्तीसगड |
| 4) सिमलीपाल अभयारण्य | iv) गोवा |

1) i ii iii iv 2) ii iii i iv

3) i ii iv iii 4) ii iii iv i

---

78. खालीलपैकी योग्य विधाने कोणती ती ओळखा

अ) मॅग्नीज साठयाच्या बाबतीत भारताचा जगात दुसरा क्रमांक लागतो

ब) भारतातील एकूण साठयापैकी सर्वाधिक साठे महाराष्ट्रात आहेत

क) महारष्ट्रात मॅग्नीजाचे उत्पादन प्रामुख्याने भंडारा जिल्ह्यात सर्वाधिक होते

ड) भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुका मॅग्नीज उत्पादनासाठी प्रसिध्द आहे

1) फक्त अ आणि ड 2) अ, क, ड 3) फक्त अ 4) वरील सर्व

---

79. एलनीनो प्रवाहाचा खालीलपैकी कोठे परिणाम होतो ?

अ) दक्षिण अमेरिकेत खूप पाऊस तर ऑस्ट्रेलियामध्ये दुष्काळ

ब) दक्षिण अमेरिकेत दुष्काळ तर ऑस्ट्रेलियात जास्त पाऊस

क) दक्षिण अमेरिकेत व ऑस्ट्रेलियात दोन्ही ठिकाणी भरपूर पाऊस

ड) दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलियात दोन्ही ठिकाणी दुष्काळ

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) फक्त ड

80. महाराष्ट्रातील जलसिंचन साधनांचा त्याने व्यापलेल्या क्षेत्रानुसार उतरता क्रम लावा
अ) विहीर जलसिंचन ब) कालवे जलसिंचन क) तलाव जलसिंचन ड) उपसा जलसिंचन
1) ब, क, अ, ड 2) क, ड , ब, अ 3) ड, क, ब, अ 4) अ, ब, क, ड

81. योग्य जोडया लावा

| (हवामान) | (जिल्हा) |
|---|---|
| 1) जांभी मृदा | i) भंडारा |
| 2) तांबडी मृदा | ii) अहमदनगर |
| 3) काळी मृदा | iii) सिंधुदूर्ग |
| 4) तपकिरी मृदा | iv) सातारा |

1) iv iii i ii 2) iii iv ii i
3) ii i iv iii 4) iii ii iv i

82. खालीलपैकी योग्य विधाने कोणते ती ओळखा
अ) महाराष्ट्रात उष्ण कटिबंधीय सदाहरीत अरण्याच्या प्रदेशापेक्षा उपउष्ण कटिबंधीय सदाहरित अरण्याच्या प्रदेशात जास्त पर्जन्य होते
ब) महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्राच्या जवळपास 19% क्षेत्र वनांनी व्यापलेले आहे
क) उपउष्ण कटिबंधीय प्रदेशात मधुमक्षीकापालन हा महत्वाचा लघुद्योगधंदा आहे
1) अ, ब, क योग्य 2) फक्त ब 3) फक्त ब व क 4) यापैकी नाही

83. खालीलपैकी अयोग्य विधाने कोणती आहेत ती ओळखा
अ) समशितोष्ण गवताळ प्रदेशात पॅपल व वॉलनट या वनस्पती आढळतात
ब) विषुववृत्तीय प्रदेशात महोगनी, शिसव वनस्पती आढळतात
क) टुंड्रा प्रदेशात ध्रुवीय ससे आढळतात
ड) पर्वतीय प्रदेशात याक आढळतात
1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ व ब 4) यापैकी नाही

84. खालीलपैकी अयोग्य विधान कोणती ती ओळखा
अ) पश्चिम घाटास सह्याद्री नंद्याचा जलविभाजक या नावानेही ओळखले जाते
ब) भारतात सह्याद्रीची उंची दक्षिणेकडून वाढत जाते
क) महाराष्ट्रात सह्याद्रीची उंची उत्तरेकडून दक्षिणेकडे वाढत जाते
ड) पश्चिम घाटात पर्जन्याचे प्रमाण दक्षिणेकडे कमी-कमी होत जाते
इ) सह्याद्रीत उत्तरेकडून दक्षिणेकडे गेल्यास पश्चिम वाहिनी नद्यांची लांबी कमी-कमी होत जाते
1) ब, क, ड 2) ब, क, इ 3) ब आणि क 4) एकही नाही

85. योग्य जोडया लावा

| (समुद्र) | (देश) |
|---|---|
| 1) काळा समुद्र | i) पोलंड |
| 2) तांबडा समुद्र | ii) कझाकिस्तान |
| 3) कॅस्पियन समुद्र | iii) तुर्कस्थान |
| 4) बाल्टिक समुद्र | iv) सौदी अरेबिया |

1) iii iv ii I 2) iv iii ii i
3) i iii iv ii 4) ii iv iii i

86. खालील विधान लक्षात घेऊन अयोग्य पर्याय निवडा
अ) 'गारो' ही जमात मेघालय, आसाम, नागालँड या राज्यात आढळते
ब) 'भुतिया' ही जमात उत्तरांचल या राज्यात आढळते
क) 'जारबा' ही जमात लक्षव्दिप भागात आढळते
1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) यापैकी नाही

87. विधान A : 'सम्पात' काळात दिवस व रात्रीचे तास समान असतात
स्पष्टीकरण R : 'सम्पात' काळात सुर्याची किरणे विषुववृत्तावर लंबरूप पडतात
1) विधान A हे R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे
2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही
3) विधान A योग्य, R अयोग्य
4) विधान A अयोग्य, R योग्य

www.spandancareers.org

88. योग्य जोडया लावा

| (गट 'अ') | (गट 'ब') |
|---|---|
| 1) हंटर कमिशन | i) 1964 |
| 2) सॅडलर विद्यापीठ कमिशन | ii) 1917 |
| 3) वुडचा खलिता | iii) 1882 |
| 4) कोठारी शिक्षण आयोग | iv) 1854 |

1) i ii iii iv 2) iii ii iv i
3) ii i iv iii 4) iv iii ii i

89. रयतवारी जमीन महसूल पध्दतीबाबत अयोग्य पर्याय कोणता तो ओळखा
अ) सर टॉमस मनोरा ही जमीन महसूल पध्दत 1820 मध्ये मुंबई इलाख्यात सुरू केली
ब) या पध्दतीत जमीन करणारे शेतकरी जमिनीचे मालक बनले आणि सरकार या शेतकऱ्यांकडूनच सारा वसूल करू लागले
क) जमीन महसूल रोख पैशात न घेता धान्याच्या रूपात घेतला जाऊ लागला
ड) महसूल आकारणी करताना पीक किंवा उत्पन्न न पाहता जमिनीच्या निकषावर केला जाईल
1) फक्त क 2) फक्त ब 3) फक्त अ 4) फक्त ड

90. सिंधु संस्कृतीला समकालीन संस्कृती ही कोणती आहे हे खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा
अ) इजिप्त क) मसोपोटॅमिया क) सुमेर ड) चीनी
1) अ आणि ब 2) ब आणि क 3) अ, ब आणि ड 4) वरीलपैकी सर्व

91. सविनय कायदेभंग चळवळीच्या वेळी मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. त्यामध्ये महाराष्ट्रात कोठे सत्याग्रह घडून आला नाही ? योग्य पर्याय निवडा
1) शिरोड - 12 मे 1930 2) वडाळा - 18 मे 1930
3) बिळाशी - 5 सप्टेंबर 1930 4) आष्टी व चिमूर - 1930

92. भारत छोडो चळवळीविषयी काही विधाने दिली आहेत त्याबाबत अयोग्य पर्याय कोणता तो ओळखा
अ) मुंबई अधिवेशनामध्ये 'चले जाव' ठराव मंजूर करण्यात आला
ब) या चळवळीचा एक भाग म्हणून भूमिगत चळवळ सुरू केली
क) या चळवळीच नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले
ड) या चळवळीतील पहिले सत्याग्रही हे विनोबा भावे होते
1) फक्त अ 2) फक्त अ व ब 3) फक्त ड 4) फक्त क

93. इ.स. 1854 च्या वुडच्या खलित्यामधील शिफारस कोणत्या आहेत. योग्य पर्याय निवडा
अ) प्राथमिक शिक्षणास अधिक उत्तेजन देण्यात यावे
ब) स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात यावे
क) लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर भारतात विद्यापीठाची स्थापना करण्यात यावी
ड) प्रत्येक प्रांतात शिक्षण खाते सुरू करून शिक्षकांसाठी ट्रेनिंग स्कूल सुरू करण्यात यावे
1) फक्त अ, ब, क 2) फक्त ब, क, ड 3) अ, ब, क, ड 4) अ, क, ड

94. योग्य जोडया लावा

| (बुध्द) | (स्थळ) |
|---|---|
| 1) जन्म | i) बोधगया |
| 2) निर्वाण | ii) लुंबिनी |
| 3) पहिले प्रवचन | iii) कुशीनगर |
| 4) महापरिनिर्वाण | iv) सारनाथ |
| | v) राजगीर |

1) ii i iii iv 2) ii i iv iii
3) i iii iv v 4) iv ii v iii

95. स्वामी विवेकानंद यांच्या बाबत खालील विधानातून योग्य पर्याय निवडा
अ) 12 जानेवारी 1863 रोजी त्यांचा जन्म झाला
ब) 1893 मध्ये शिकागो येथे भरलेल्या जागतिक परिषदेला ते हजर होते
क) 1897 मध्ये त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली
ड) 'उठा जागे व्हा आणि ध्येय सिध्दी झाल्याशिवाय थांबू नका' असा संदेश हिंदी लोकांना दिला
1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, ब, क, ड 4) अ, क, ड

www.spandancareers.org

96. अल्लाउद्दीन खिल्जीच्या आक्रमणाच्या वेळेस देवगिरीचा राजा कोण होता ?

1) रामचंद्र देव 2) प्रतापरूद्र देव 3) मलिका कापूर 4) राणा रतन सिंग

97. 'अभिनव भारत' संघटनेचा पुढीलपैकी कोणता उद्देश होता ?

अ) परदेशामध्ये सशस्त्रे खरेदी करून ती गुप्तपणे भारतात पाठवणे

ब) भारतीय सैनिकांमध्ये ब्रिटिशांविरोधी प्रचार करणे

क) स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या कार्यक्रमाव्दारे लोकमत तयार करणे

ड) शक्य त्या ठिकाणी गणीमी काव्याने लढा चालविणे

1) फक्त अ व ब योग्य 2) क व ड योग्य 3) वरील सर्व योग्य 4) फक्त अ योग्य

98. माणगाव येथे झालेल्या अस्पृश्यता निवारण परीषदेच्या बाबतीतील अयोग्य पर्याय कोणता तो निवडा

अ) 20 व 21 मार्च 1920 रोजी कागल जहागिरीतील 'माणगाव' येथे भरली होती

ब) आप्पासाहेब पाटील यांच्या मदतीने ही परिषद भरली होती

क) या परिषदेत शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य चळवळीचे नेतृत्व करण्याची अपेक्षा व्यक्त केली

ड) या परिषदेमध्ये दरवर्षी अस्पृश्य परिषद भरविण्याची घोषणा डॉ. आंबेडकरांनी केली

1) फक्त अ 2) फक्त अ, ब 3) फक्त ड 4) फक्त क, ड

99. सर्वात महत्वाचा बादामीचा चालुक्य सम्राट खालीलपैकी कोण होता. अचूक पर्याय निवडा

1) पुलकेसीन - I 2) पुलकेसीन - II 3) विनायादित्य 4) विक्रमादित्य - I

100. योग्य जोडया लावा

| (संस्था) | (स्थापना वर्ष) |
|---|---|
| 1) बॉम्बे असोसिएशन | i) 1866 |
| 2) सार्वजनिक सभा | ii) 1852 |
| 3) ईस्ट इंडिया असोसिएशन | iii) 1851 |
| 4) ब्रिटिश इंडिया असोसिएशन | iv) 1870 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | ii | iv | i | iii |
| 2) | iv | i | ii | iii |
| 3) | iii | i | ii | iv |
| 4) | iii | iv | i | ii |

www.spandancareers.org